# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५८/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. निरंजन क्रिष्णमुर्ती**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१) एन विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एन विभाग यांचे कार्यालय,
पहिला मजला, जवाहर रोड, घाटकोपर पश्चिम,
मुंबई ४०० ०७७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, एन विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एन विभाग यांचे कार्यालय,
तिसरा मजला, जवाहर रोड, घाटकोपर पश्चिम,
मुंबई ४०० ०७७

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०६.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्ट नुसार दि. ०९.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ४३७१/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १६४९/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०२.०१.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहेत."*

उक्त आदेशानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि- १) एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक अभियंता एन विभाग, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०३.०२.२०२० व स्मरणपत्र दि. ०७.१२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि- १) एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक अभियंता एन विभाग, मुंबई यांच्याकडून दि. २९.१२.२०२० रोजी आयोगास अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये नमुद केले आहे की, तक्रारदार श्री. नटराजन कृष्णमुर्ती यांनी या विभागाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेल्या अर्जास उत्तर देण्यात आले होते. तथापि, त्यानंतर श्री. नटराजन कृष्णमुर्ती यांनी आपल्या विभागाकडे केलेल्या अपीलाच्या अनुषंगाने व त्यावरील माननीय, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशानुसार या कार्यालयामध्ये उपलब्ध माहितीचा पुन्हा शोध घेतला आहे. तथापि तक्रारदार यांनी मागितलेली माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर असल्याचे दिसून येत नाही.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २१.०६.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, यापुर्वी दि. २९.१२.२०२० रोजी आयोगास अहवाल सादर केला आहे व त्यांच्या अभिलेखाप्रमाणे "No any permission given for trench." यामुळे परवानगी न दिल्याने त्यांच्या अभिलेखावर माहिती उपलब्ध नाही. तसे तक्रारकर्ता यांना दि. २९.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

25-6-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२५**